# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
# खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
# नोंदनी क्रमांक – ई-3342/2017 दिनांक 27/11/2017

**आदेश क्र. जिखप्र/प्रमा - शिक्षण** /488 /2026

**दिनांक :** 30-03-2026

## प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश

**विषय -** प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "शिक्षण" या शिर्षकाखाली नागपूर शहर पूर्व नागपूर येथील जुना बगडगंज अभिन्यासातील मोकळया भुखंडकावर आधुनिक विकास केंद्राचे (Modern Science Centre) बांधकाम करणे या कामाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण.

**वाचा -**

1. भारत सरकार खाण मंत्रालय प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे सुधारीत मार्गदर्शक सूचना दिनांक 15/01/2024
2. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/ प्र.क्र. 10/उद्योग-9 मंत्रालय, मुंबई-32, दि. 11 ऑक्टोबर 2024
3. अधिक्षक अभियंता (मुखालय), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचे पत्र क्रमांक अधी.अभि.(मुखा.)/3612/, नागपूर दिनांक 25/03/2026
4. मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक 30 /03 /2026 रोजीच्या मंजूर टिपणीनूसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 च्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता (मुखालय), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "शिक्षण" या शिर्षकाखाली नागपूर शहर तालुक्यातील पूर्व नागपूर येथील प्लॉट नं. 145 ख.क्र. 248 जुना बगडगंज अभिन्यासातील मोकळया भुखंडकावर आधुनिक विकास केंद्राचे (Modern Science Centre) बांधकाम करणे या कामाकरीता रू. 20,00,00,000/- रकमेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. त्यापैकी रू. 15,00,00,000/- (अक्षरी- रू. पंधरा कोटी फक्त) इतक्या रकमेला मान्यतेकरीता प्रस्तावित करण्यात येईल. तसेच सदर प्रस्तावाचे अंदाजपत्रक तयार करून सदर प्रस्तावास अधिक्षक अभियंता (मुखालय), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी तांत्रिक अनुमती प्रदान केलेली आहे. संदर्भ क्र. 4 च्या मंजुर टिपणीनुसार मा.जिल्हाधिकारी महोदयांनी सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान केलेली आहे.

## नियोजित कामांचे विवरण

| अ.क्र | तालुका | मौजा | कार्यान्वित यंत्रणा | कामाचे विवरण | प्रशासकीय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरीत 20% निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नागपूर शहर | जुना बगडगंज | अधिक्षक अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास | नागपूर शहर तालुक्यातील पूर्व नागपूर येथील प्लॉट नं. 145 ख.क्र. 248 जुना बगडगंज अभिन्यासातील मोकळया भुखंडकावर आधुनिक विकास केंद्राचे (Modern Science Centre) बांधकाम करणे | 15,00,00,000 | 3,00,00,000 | प्रत्यक्ष बाधित क्षेत्र (उच्च प्राथम्य बाबी) |
| एकुण | | | | | 15,00,00,000 | 3,00,00,000 | |
| | | | | | | | (अक्षरी- रू तीन कोटी फक्त) |

**त्याअर्थी, संदर्भ क्र. 1 व 2 शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) अंतर्गत "शिक्षण" या शिर्षकाखाली रू. 15,00,00,000/- (अक्षरी- रू. पंधरा कोटी फक्त) रकमेच्या कामांस नियामक परिषदेच्या कार्योत्तर मान्यतेचा अटीवर**

